# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

## विद्यापीठाने निर्मिती केलेले सुधारीत व संकरीत वाणाबद्दल सर्व समावेशक व सविस्तर माहिती

| अ.क्र. | | तपशील | सविस्तर माहिती |
|---|---|---|---|
| १ | | पीक/वाणाचे नाव | भात : पराग |
| २ | | प्रसारीत केल्याचे वर्ष | १९९६ |
| ३ | | प्रसारीत करणारी संस्था/विद्यापीठ | वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी |
| ४ | | जमीन | काळी कसदार जमीन |
| ५ | | हवामान | उत्तम पर्जन्यमान असलेले हवामान |
| ६ | | पेरणी/लागवडीचा कालावधी | खरीप |
| ७ | | प्रती एकर बियाणे | २५ किलो |
| ८ | | पीक व्यवस्थापन | |
| | १ | लागवडीचे/पेरणीचे व्यवस्थापन | पेरणी पाभरीच्या सहाय्याने १५ जून ते १५ जुलै दरम्यान करावी. |
| | २ | खत व्यवस्थापन | ८०:५०:५० नत्र, स्फुरद व पालाश कि./हे. द्यावे या खताची मात्रा तीन हफ्त्यात द्यावी.<br>१. पेरणीच्या वेळी २० टक्के नत्र, १०० टक्के स्फुरद व पालाश पेरुन द्यावे.<br>२. पेरणीनंतर ३० दिवसांनी ५० टक्के नत्र द्यावे.<br>३. पेरणीनंतर ६० दिवसांनी राहिलेले ३० टक्के नत्र द्यावे. |
| | ३ | पाणी व्यवस्थापन | पाऊसाचा ताण पडल्यास पाणी देणे आवश्यक आहे. |
| | ४ | कीड व्यवस्थापन | खोडकिडी : या किडीच्या नियंत्रणासाठी १६०० मिली क्विनॉलफॉस प्रती हेक्टरी ५०० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>पाने गुंडाळणारी अळी : या किडीच्या नियंत्रणासाठी मोनोक्रोटोफॉस ७०० मिली किंवा क्लोरोपायरीफॉस २० ईसी १ लीटर ५०० लीटर पाण्यात मिसळून फवारावी. |
| | ५ | रोग व्यवस्थापन | करपा : हा एक बुरशीजन्य रोग असुन या पिकाच्या सर्वच अवस्थेत आढळुन येतो.<br>मानेवरील करपा : यामध्ये लोंबीच्या देठावर गर्द, तपकिरी व काळे ठिपके पडुन मान कुजुन जाते.<br>वरील रोगाच्या नियंत्रणासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून कार्बेन्डॉझिम २ ग्रॅम प्रती किलो बियाण्यास पेरणीपुर्वी बीजप्रक्रिया |

| | | |
|---|---|---|
| | | करावी. |
| ९ | **पिकाचा कालावधी** | १०५ - ११० दिवस |
| १० | **उत्पादकता** | ४०-४२ क्विं. प्रती हेक्टरी |
| ११ | **वाणाची वैशिष्ट्ये/विशेष गुणधर्म** | १. लोह कमतरतेस बळी न पडणारा<br>२. अधिक उत्पन्न देणारा वाण<br>३. बागायती वाण |
| १२ | **वाणासंबंधीचे छायाचित्रे** |  |